# आकाशवाणी पुणे

# प्रादेशिक वृत्त विभाग

# पुणे वृत्तांत

# वेळ - संध्याकाळी 06.00 वा.

**दिनांक-25.05.2026** **वार- सोमवार**

---

**सामंजस्य करार**

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत मुंबईत आज राज्य शासन आणि अग्रेको इंडिया कंपनी यांच्यात एक सामंजस्य करार झाला. या करारामुळे पुण्यात पुढच्या दहा वर्षांत सुमारे चारशे कोटी रुपयांची गुंतवणूक आणि एक हजारपेक्षा जास्त थेट रोजगाराची निर्मिती होईल असा विश्वास मुख्यमंत्र्यांनी यावेळी व्यक्त केला. कंपनीला उत्कृष्ट कार्यपरिसर मिळण्याबरोबरच आवश्यक सर्व सहकार्य करण्याची ग्वाही त्यांनी दिली.

अग्रेको इंडिया ही कंपनी ऊर्जा आणि तापमान नियंत्रण उपाययोजना या क्षेत्रात कार्यरत आहे. आज झालेल्या करारानुसार कंपनीतर्फे पुणे जिल्ह्यातील फुलगाव इथं अत्याधुनिक जागतिक अभियांत्रिकी आणि उत्पादन केंद्र उभारलं जाणार आहे; त्याचं काम याच वर्षी सुरु होणार आहे. हे केंद्र स्कॉटलंडबाहेरील ॲग्रेकोचे सर्वात महत्त्वाचे जागतिक अभियांत्रिकी आणि उत्पादन केंद्र असेल.

**जिल्हाधिकारी**

केंद्रीय निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार राज्यात विशेष सखोल मतदार पुनरिक्षण मोहीम राबवली जाणार आहे. पुणे जिल्ह्यातील ९१ लाखांहून अधिक मतदारांच्या नोंदींची घरोघरी जाऊन प्रत्यक्ष पडताळणी केली जाणार आहे, मतदार यादी अधिक अचूक, पारदर्शक आणि अद्ययावत करण्यासाठी ही मोहीम हाती घेण्यात आली आहे, अशी माहिती जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांनी दिली आहे. जिल्ह्यातील ८ हजार ४१७ मतदान केंद्र स्तरीय अधिकारी आणि विविध राजकीय पक्षांचे ४ हजार ५५७ मतदान केंद्रस्तरीय प्रतिनिधी या प्रक्रियेत सहभागी होणार आहेत, असंही डुडी यांनी सांगितलं.

**जनगणना**

जनगणनेच्या कामात दिरंगाई करणाऱ्या कर्मचाऱ्यांवर कडक कारवाई करण्याचे निर्देश पिंपरी चिंचवड महापलिका आयुक्त आणि प्रधान जनगणना अधिकारी डॉ. विजय सूर्यवंशी यांनी दिले.  या संदर्भात पिंपरीमध्ये झालेल्या आढावा बैठकीत ते बोलत होते. जनगणना ही अत्यंत महत्त्वाची प्रक्रिया असून त्यामध्ये कोणत्याही प्रकारचा निष्काळजीपणा, टाळाटाळ किंवा हलगर्जीपणा खपवून घेतला जाणार नाही, असं सूर्यवंशी म्हणाले.

**नीट**

नीट पेपरफुटी प्रकरणी अटकेत असलेल्या प्राध्यापक मनिषा हवालदार यांना दिल्लीच्या राऊज अव्हेन्यू न्यायालयाने सहा दिवसांची सीबीआय कोठडी दिली आहे. विशेष न्यायाधीश अजय गुप्ता यांच्यासमोर या प्रकरणाची आज सुनावणी झाली. मनिषा हवालदार यांना २२ मे रोजी अटक करण्यात आली होती, हवालदार यांनी नीटच्या भौतिकशास्त्राच्या पेपरचे प्रश्न विद्यार्थ्यांना पुरवल्याचा सीबीआयला संशय आहे.

दरम्यान नीट परीक्षेच्या आयोजनात वारंवार त्रुटी राहत असल्याबद्दल सर्वोच्च न्यायालयानं आज चिंता व्यक्त केली. याआधी पेपरफुटी होऊनही एनटीए नं त्यापासून काहीच धडा घेतला नाही हे खेदजनक आहे, अशी टिप्पणी न्यायालयानं केली. वैद्यकीय प्रवेश परीक्षा घेण्यासाठी एनटीए ऐवजी दुसऱ्या स्वायत्त संस्थेची स्थापना करावी, अशी मागणी करणाऱ्या याचिकेवरल्या सुनावणीवेळी न्यायाधीश न्यायमूर्ती पी. एस. नरसिंहा आणि न्यायमूर्ती आलोक आराधे यांच्या खंडपीठाने ही टिप्पणी केली.

**पुणेमॅनेजमेंट असोसिएशन**

पुणे मॅनेजमेंट असोसिएशन या संस्थेचा ४९वा वर्धापन दिन येत्या बुधवारी साजरा होत आहे. यंदा 'विकसित भारत' या संकल्पनेवर वर्धापन दिन साजरा केला जाणार असून विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या व्यक्ति आणि संस्थांचा गौरवही केला जाईल, अशी माहिती पुणे मॅनेजमेंट असोसिएशनचे उपाध्यक्ष प्रदीप तुपे यांनी आज पत्रकार परिषदेत दिली. आयएमडीआर, स्वरूपवर्धिनी, या संस्थानसह प्रशांत बोरा, श्वेता शालिनी, गौरव त्रिपाठी यांना सन्मानित केलं जाणार आहे.

**दरवाढ**

पेट्रोलच्या दरात आज २ रुपये ६१ पैसे, तर डिझेलच्या दरात
२ रुपये ७१ पैशांची वाढ झाली. गेल्या दोन आठवड्यातली पेट्रोल- डिझेलची ही चौथी दरवाढ आहे. अमेरिका-इराण युद्धामुळे जागतिक स्तरावर कच्च्या तेलाचे दर वाढल्यामुळे पेट्रोल-डिझेलच्या किमती वाढत असल्याचं सांगितलं जात आहे.

**अपघात**

महाबळेश्वर आणि पोलादपूरला जोडणाऱ्या आंबेनळी घाटात आज पहाटे एक चारचाकी खोल दरीत कोसळून झालेल्या भीषण अपघातात ८जणांचा मृत्यू झाला. हर्णे बंदर इथं फिरायला गेलेले सातारा जिल्ह्यातले आठजण परतत असताना चालकाचा ताबा सुटून हा अपघात झाला. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या अपघाताबद्दल दुःख व्यक्त केलं आहे.

**अपघात**

पुणे जिल्ह्यातील जुन्नर तालुक्यात डिंगोरे इथे काल रात्री झालेल्या रस्ते अपघातात चार जणांचा मृत्यू झाला. अहिल्यानगर कल्याण महामार्गावर डिंगोरे इथे एसटी बस आणि दुचाकीची धडक झाली; यात दुचाकीवरील ४ तरुणांचा मृत्यू झाला.

**हवामान**

पुणे आणि परिसरात आज कमाल तापमान 36 अंश तर किमान तापमान 24 पूर्णांक 2 दशांश अंश सेल्सियस नोंदवलं गेला. उद्याही तापमानात फारसा बदल होण्याची शक्यता नाही; तसंच दुपारनंतर हलक्या पावसाचाही अंदाज हवामान विभागानं वर्तवला आहे.

**हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू, विविध भारती पुणे केंद्रावर, संध्याकाळी सहा वाजता, ताज्या पुणे वृत्तांत मध्ये, नमस्कार.**